---------------------------

Media Coverage – Development of 30,000 Ltr Water Tank & Water Pipeline and handing over truck for Garbage disposal at Jamner Railway Station by Bharat Forge

पुढारी

# भारत फोर्जकडून धामणेरला घंटागाडीचे लोकार्पण

**सातारा : प्रतिनीधी**

भारत फोर्ज लिमिटेड पुणे या कंपनीने आदर्श गाव धामणेरसाठी घंटागाडी, रेल्वे स्टेशन वसाहतीसाठी ३० हजार लि. साठवण क्षमतेच्या पिण्याच्या पाण्याची टाकी, पाईपलाईन दिली असून घंटागाडीचे लोकार्पण सोहळा भारत फोर्ज पुणेच्या सीएसआर विभागाच्या विभागप्रमुख लिना देशपांडे यांच्या हस्ते व माजी आयकर आयुक्त अरुण पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.



**पाण्याच्या टाकीच्या भूमिपूजनप्रसंगी लिना देशपांडे, अरूण पवार, प्रकाश पवार, शहाजी क्षीरसागर व इतर.**

कार्यक्रमास निवृत्त कर्नल प्रकाश पवार, जयदीप लाड, आदर्श सरपंच शहाजी क्षीरसागर, सरपंच सौ. संजीवनी सुतार, उपसरपंच उत्तमराव क्षीरसागर, सर्व ग्रामपंचायत सदस्य, सोसायटीचे चेअरमन व सर्व संचालक, ग्रामस्थ उपस्थित होते. धामणेरने गेल्या सतरा वर्षांत संपूर्ण महाराष्ट्रभर आपल्या स्वच्छतेचं वेगळेपण टिकवून ठेवले आहे. सातत्याने होणारा बदल व नवनवीन संकल्पना शोधून गावात शहाजी क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली अरुण पवार यांच्या मार्गदर्शनाने काम सुरू आहे. कचऱ्यापासून खतनिर्मिती करणे हा उपक्रम गेली सतरा वर्षे सुरू आहे.ग्रामपंचायतीला घंटागाडी असावी, यासाठी तसा प्रस्ताव भारत फोर्ज लिमिटेड या कंपनीकडे सादर केला होता. कंपनीचे चेअरमन बाबासाहेब कल्याणी यांनी लगेच मान्यता देत २१ एचपीचा ट्रॅक्टर व ट्रॉली ग्रामपंचायतीस उपलब्ध करून दिली. गावचा परिसर मोठा असल्याने पाणी साठवण क्षमता अपूर्ण पडते. त्यामुळे लोकांना दररोज सकाळी पाणी पुरवठा करता येत नाही. पाण्याच्या टाकीच्या कामाची कंपनीकडे मागणी केल्यानंतर एका महिन्यात तसा प्रस्ताव मंजूर केला.श्रीमती देशपांडे म्हणाल्या, धामणेर गावाने राज्याला घालून दिलेला स्वच्छतेचा आदर्श आदर्शवत आहे. अरुण पवार म्हणाले, धामणेरमध्ये महिलांनी छोटे उद्योग सुरू करुन आपल्या कुटुंबाचा आर्थिक पाया मजबूत करावा. शहाजी क्षीरसागर यांनी प्रास्तविकात धामणेरचा संपूर्ण पाणीपुरवठा सौर ऊर्जेवर करण्याच्या कामाला सहकार्य करण्याचे आवाहन कंपनी पदाधिकाऱ्यांना केले. अशोक देसाई यांनी आभार मानले. यावेळी ग्रामविकास अधिकारी, ग्रामस्थ, महिला उपस्थित होत्या.

Satara
Page No. 04 Jan 16, 2018
Powered by: erelego.com